पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

# प्रेसनोट क्र. ६४ दिनांक १०/११/२०२२

# “जनसंवाद अभियान” अंतर्गत तलासरी पोलीस ठाणे येथे महिला समुपदेशन मेळाव्याचे आयोजन

पोलीस दलाचा सर्वसामान्य जनतेशी चांगला सुसंवाद व समन्वय राहावा तसेच पोलीस ठाणे हद्दीतील प्रत्येक गावामध्ये शांतता व सुरक्षीतता आबाधित राहावी, या निमित्ताने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे अनमोल संकल्पनेतुन **“जनसंवाद अभियान”** ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने दि.०९/११/२०२२ रोजी तलासरी पोलीस ठाणे अंतर्गत महिला समुपदेशन मेळावाचे आयोजन करण्यात आले.

जनसंवाद अभियान अंतर्गत महिला समुपदेशन मेळावा करीता १. गोखले एज्येकेशन सोसायटीचे ठक्करबाप्पा कॉलेज, तलासरी २. कॉ. गोदावरी शामराव परुळेकर कॉलेज तलासरी, ३. औदयोगिक प्रशिक्षण संस्था, तलासरी ४. शासकीय माध्यमिक कन्या आश्रमशाळा, वरवाडा ५. शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, उधवा कासपाडा ६. दयानंद हॉस्पीटल नर्सिंग कॉलेज, वडवली ७.तलासरी तालुका आशा वर्कर ८. तलासरी तालुका महिला बचत गट तसेच महिला दक्षता कमिटी सदस्य असे एकुण १८०० महिला वर्ग हजर होते.

सदर महिला मेळावामध्ये अल्पवयीन मुलींचे विवाह बाबत समुपदेशन, कौटुबिक हिंसाचार बाबत मार्गदर्शन, सायबर गुन्हे बाबत मार्गदर्शन, महिला अत्याचार, महिला विषयी कायदे तसेच महिला बचत गट व करीयर मार्गदर्शन, महिला सुरक्षा व महिलांसाठी कौशल्य विकास व महिलासांठी असलेल्या योजनांची माहिती व मार्गदर्शन तसेच राजकीय, सामाजिक, शासकीय विभागातील कार्यरत असलेल्या तज्ञ व्यक्तीकडुन उपस्थित महिलांना मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले.

सदर कार्यक्रम हा श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे मार्गदर्शनाखाली संपन्न झाला असून सदर कार्यक्रमास आमदार श्री. विनोद निकोले, डहाणु विधानसभा, आमदार श्री. श्रीनिवास वनगा, पालघर विधानसभा, श्रीमती हेमांगिणी पाटील, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी वाशी, नवी मुंबई, श्रीमती शारदा शिंदे, माजी अध्यक्षा बाल कल्याण समिती पालघर, श्रीमती राजकन्या आडोळे, अध्यक्षा बाल कल्याण समिती पालघर, श्री. विनोद राठोड, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी पालघर, श्री. श्रीधर गालीपेल्ली, तहसिलदार तलासरी, श्री. अजय वसावे, पोलीस निरीक्षक, तलासरी पोलीस ठाणे व पोलीस अंमलदार उपस्थीत होते.





